**तक्रार यूएलपी क्र १५/२०२०.**
**नि क्र युडब्ल्यू १ श्रीमती गौसिया कौसर शेख**

शपथेवर कथन करतो की;

माझे नाव **श्रीमती गौसिया कौसर शेख** वय. ५७ वर्षे राहणार – विजापूर नाका; सोलापूर.

मी याकामी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र **नि क्र यूडब्ल्यू १** खाली दाखल केले असून ते मी वाचले आहे त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. प्रतिज्ञापत्रावर माझी सही आहे. मला प्रतिज्ञापत्रा व्यतिरिक्त अन्य काही सांगायचे नाही.

**<u>उलटतपासणी सामनेवालेतर्फे श्रीमती एस एच कोकरे, विधिज्ञ यांचेमार्फत,</u>**

**११.** माझे शिक्षण ७ वी पर्यत झाले आहे. मला दोन मुले व दोन मुली आहेत. त्यांची नावे पहिला मुलगा मजहर कौसर शेख, दुसरा मुलगा मुख्त्यार कौसर शेख, मुलगी आयेशा मैनुदीन शेख, मुलगी मतीमंद अफरीन कौसर शेख असे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, इतर वारसांना याकामी पक्षकार केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मयत कौसर शेख दि.१६/१२/१९८८ रोजी रोजंदारी शिपाई म्हणून कामास लागले याबाबत कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दि.३१/१२/२०१८ रोजी ते वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले याबाबत कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना शेवटी दररोज रुपये ३४५/- दराने पगार मिळत होता हे दाखविण्याकरिता कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत. मयत कौसर शेख यांचे १० वी पर्यतचे शिक्षण झाले होते.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, मयत कौसर शेख हे १९८८ पासून २०१८ पर्यंत सलग ३० वर्षे सेवा केली हे मी खोटे सांगत आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की सन १९९३ मध्ये २४० दिवसांपेक्षा जास्त दिवस काम केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तक्रार दाखल करतेवेळी हजर दिवस दाखविण्याकरिता तक्रारीसोबत तक्ता दाखल केला नाही. मयत कौसर शेख यांनी २४० दिवस सलग काम केले हे मी त्यांच्या वेतनचिठठीनुसार कथन करत आहे. पगार स्लीप माझे घरी आहे.

**प्रश्न :-** मयत कौसर शेख रोज कामास जात होते याबाबत कागदोपत्री पुरावा याकामी दाखल केला नाही ?

**उत्तर :-** याबाबत कागदपत्रे मी माझे वकीलांकडे दिला आहे.

**१३.** हे मला माहित नाही की, यापूर्वी तक्रार यूएलपी क्र ५६/२००५ दाखल करून सेवेत कायम करण्याची मागणी केली होती तक्रारीसोबत जोडलेले परिशिष्टामध्ये त्यांचे नाव **अ.क्र.३७** वरती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मयत कौसर शेख यांना जेव्हा जेव्हा काम उपलब्ध होईल त्या त्यावेळी काम दिले जात होते. हे म्हणणे खरे आहे की, जितके काम केले त्या दिवसाचा वेतन दिले जात होते.

**१४.** आता मला माझे प्रतिज्ञापत्र परिच्छेद ५ पान क्र ३ दाखविण्यात आले. सदर परिच्छेदामध्ये तक्रारदाराने सेवा काळात सन १९९३ मध्ये प्रथमतः २४० दिवसांपेक्षा जास्त दिवस सेवा पूर्ण केली व त्यावर्षी एकूण ३०९ दिवस प्रत्यक्षात नोकरी केली असा मजकूर लिहिला आहे. वरील मजकूराबाबत नि.क्र.यू.१५ सोबत कागदपत्र अभिलेखावर दाखल केली आहे. आता मला नि.क्र.यू.१५ दाखविण्यात आले त्यावर दि.१७/०१/२०२० अशी तारीख आहे. सदरची माहिती मला माहिती अधिकाराखाली दिलेल्या अर्जानुसार तक्त्याच्या स्वरूपात दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८८ ते १९९३ पाच वर्षाचा कालावधी झाला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मयत कौसर शेख यांना वर्षानुवर्षे राबवून घेतले कायम सेवेपासून वंचित ठेवले हे माझी कथन खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मयत कौसर शेख यांची नियमाप्रमाणे नेमणुक झाली नव्हती म्हणून त्यांना कायम करण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदरची तक्रार चुकीच्या माहितीच्या आधारे दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी तक्रारीत केलेली मागणी चुकीची आहे.

**उलटतपासणी पूर्ण.**

**फेरतपास काहीही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही

(मु. रा. कुंभार)

सदस्य

औद्योगिक न्यायालय सोलापूर

सोलापूर.

दिनांक.१०.११.२०२५

*माकम*